महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.५/२१२२७
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
**दिनांक ११.०८.२०२२**

# परिपत्रक

**विषय :** **भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७५ वा वर्धापन दिन समारंभ.**

**संदर्भ :** सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.सीईआर-२०२२/प्र.क्र.९४/३० दि.१०.०८.२०२२.

भारतीय स्वातंत्र्याचा सोमवार दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ रोजी ७५ वा वर्धापन दिन साजरा करण्यात येणार आहे. शासनाने सन २०१९ प्रमाणे यावर्षी राज्यात स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम आयोजीत करण्याबाबत संदर्भात शासन परिपत्रकाद्वारे सविस्तर शासन निर्देश पारीत केले आहे.

२. संदर्भीत शासन परिपत्रकामधील निर्देशानुसार यावर्षी महावितरण कंपनीमध्ये भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७५ वा वर्धापन दिन समारंभ साजरा करण्यात यावा. तसेच सदर कार्यक्रम साजरा करताना करोना विषाणुच्या पार्श्वभुमीवर केंद्र शासनाच्या गृह मंत्रालय तसेच आरोग्य व कुटुंब मंत्रालय यांनी दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

३. सबब, सदर परिपत्रकाद्वारे महावितरण कंपनीतील सर्व कार्यालयांतील अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, स्वातंत्र्यदिनाचा ७५ वा वर्धापन दीन साजरा करीत असताना महाराष्ट्र शासनामार्फत दि. १० ऑगस्ट २०२२ रोजी पारीत करण्यात आलेल्या शासन परिपत्रकातील निर्देशांचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**सोबत:** शासन परिपत्रक दि.१०.०८.२०२२.

(अ.म.भादीकर)
**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**
संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना:**
१) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.
२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
३) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (महसूल व देयके) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना:**
१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) / (माहिती तंत्रज्ञान) / मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)
५) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
६) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
७) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७५ वा वर्धापन दिन समारंभ.
**सोमवार, दिनांक १५ ऑगस्ट, २०२२.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक क्र.सीईआर-२०२२/प्र.क्र.९४/३०**
राजशिष्टाचार शाखा, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १० ऑगस्ट, २०२२.

## शासन परिपत्रक

सोमवार, दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ रोजी भारतीय स्वातंत्र्यदिनाचा ७५ वा वर्धापन दिन साजरा करण्यात येणार आहे. सन २०१९ प्रमाणे यावर्षी राज्यात स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत :-

१) राज्यात सर्व विभागीय/जिल्हा/उप विभागीय/तालुका मुख्यालयात तसेच ग्रामपंचायत मुख्यालय येथे ध्वजारोहण करुन स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात यावा.

२) विभागीय आयुक्त पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, अमरावती व कोकण यांनी आपापल्या विभागातील तसेच जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी ध्वजारोहण समारंभ आयोजित करण्याची योग्य ती व्यवस्था करावी.

३) राज्याचा मुख्य शासकीय कार्यक्रम मा.मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते मंत्रालय, मुंबई येथे सकाळी ९.०५ वाजता ध्वजारोहण करुन साजरा करण्यात येईल. पुणे येथे मा.राज्यपाल महोदयांच्या हस्ते ध्वजारोहण होईल.

४) ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाच वेळी म्हणजे सकाळी ९.०५ वाजता आयोजित करण्यात यावा. सदर दिवशी सकाळी ८.३५ ते ९.३५ वा. या वेळेत ध्वजारोहणाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा निमशासकीय समारंभ आयोजित करण्यात येवू नये. जर एखाद्या कार्यालयाला अथवा संस्थेला आपला स्वत:चा ध्वजारोहण समारंभ करावयाचा असल्यास त्यांनी तो सकाळी ८.३५ वा. च्या पूर्वी किंवा ९.३५ वा.च्या नंतर आयोजित करावा.

५) राष्ट्रध्वजाला वंदन करताना राष्ट्रगीत वाजविण्यात यावे. सलामीच्या वेळी सज्ज असलेला बॅण्ड सलामीपूर्वी व सलामीनंतर वाजवावा.

६) यावेळी करण्यात येणाऱ्या भाषणांचा विषय हा स्वातंत्र्यदिनाचे महत्व विशद करणारा तसेच उपस्थितांना देशाची एकता व अखंडता अबाधित ठेवण्यासाठी कार्य करण्यासाठी प्रेरित करणारे असावा.

७) संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसिलदार हे अनुक्रमे उपविभागीय मुख्यालय व तालुका मुख्यालय आणि सरपंच किंवा गांव प्रमुख हे ग्रामपंचायत मुख्यालय येथे ध्वजारोहण करतील.

८) समारंभास उपस्थित राहणाऱ्या सर्व व्यक्तींनी राष्ट्रीय पोषाख परिधान करावा.

९) दिवसभरातून विविध कार्यक्रम जसे :- वृक्षारोपण, आंतर शालेय/आंतर महाविद्यालय यांच्या स्तरावर Online पध्दतीद्वारे वाद-विवाद स्पर्धा, प्रश्नमंजूषा/देशभक्तीपर निबंध व कविता स्पर्धाचे आयोजन करावे. सोशल मिडीयाद्वारे निवडक विद्यार्थी / विद्यार्थीनींचे देशभक्तीपर गाणे/भाषणे आयोजित करावीत. शासकीय इमारतीवर विद्युत रोषणाई करावी, एखादया विषयाचा Webinar आयोजित करावा, एनएसएस व एनवायकेएस द्वारे देशभक्तीपर Online मोहिम राबविण्यात यावी, तसेच सोशल मिडीया व Digital माध्यमाद्वारे देशभक्तीपर किंवा राष्ट्रीय एकात्मते संबंधातील गाण्यांचा प्रचार करावा/संदेश द्यावा.

१०) राज्यातील सर्व सार्वजनिक व शासकीय इमारतीवर (ग्रामीण भागात सुध्दा) तसेच ऐतिहासिक महत्वाच्या किल्ल्यांवर (उदा.रायगड, सिंहगड, शिवनेरी, पुरंदर, वसई, प्रतापगड, दौलताबाद, सिताबर्डी) राष्ट्रध्वज उभारण्यात यावा.

११) राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पध्दतीबाबत शासन परिपत्रक क्रमांक : एफएलजी-१०९१/३०, दिनांक २० मार्च, १९९१ व क्रमांक एफएलजी-१०९१ (२)/३०, दिनांक ५ डिसेंबर, १९९१ आणि परिपत्रक क्रमांक : एफएलजी १०९८/३४३/३०, दिनांक ११ मार्च, १९९८ अन्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. ध्वजारोहणाची रंगीत तालीम घेतली जाईल याचीही दक्षता घ्यावी. राष्ट्रध्वज चांगल्या स्थितीत असल्याची व सूर्यास्तास उतरवला जाईल याचीही दक्षता घेण्यात यावी.

१२) खासदार, आमदार, जिल्हा परिषद/पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, स्वातंत्र्य सैनिक, शहिद जवानांच्या पत्नींना व आई-वडीलांना, स्थानिक राजकीय पक्षांचे प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त व्यक्ती, स्थानिक शासकीय अधिकारी आणि प्रमुख नागरिक यांना मुख्य शासकीय कार्यक्रमास निमंत्रित करावे.

१३) विभागीय आयुक्त पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती हे त्यांच्या विभागीय मुख्यालयात ध्वजारोहण समारंभाची व्यवस्था करणार असल्यामुळे तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी वेगळे कार्यक्रम करण्याची आवश्यकता नाही. विभागीय आयुक्त, कोकण हे कोकण भवन येथील समारंभाची व्यवस्था करतील. **जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी ध्वजारोहणाची कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.**

१४) संबंधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी आपापल्या अधिकारक्षेत्रात स्वातंत्र्य दिन समारंभ साजरा करण्यासंबंधी आवश्यक ती कार्यवाही कृपया करावी. विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी या परिपत्रकात दिलेले निदेश योग्य प्रकारे पाळण्यात येतील, याची व्यक्तीश: दक्षता घ्यावी.

१५) आचारसंहिता अंमलात असल्यास खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत असून सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी:-

अ) ध्वजारोहणाच्या नेहमीच्या स्थळामध्ये बदल करण्यात येऊ नये.

आ) कार्यक्रमाचा राजकीय व्यासपीठासारखा वापर करु नये.

२. विभागीय मुख्यालयी / जिल्हा मुख्यालयी ध्वजारोहण करण्यासाठी उपस्थित राहणा-या मान्यवरांबाबत सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत.

३. हा कार्यक्रम साजरा करताना कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या गृह मंत्रालय व तसेच आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, यांनी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२२०८१०१९३३२९८२०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KRANTI BHIMRAO PATIL

Digitally signed by KRANTI BHIMRAO PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=82bdf2956da62b4fc2f658725d7587906d3cf8eb3117ad97f90ef418d0d39a41, pseudonym=C3D2F9DB5284F5615042877F6E8343E70BF26CFF, serialNumber=4CB4EDEE9A9967B63A896631DCC4A6E70FF0378E5AF63877798F67DE75ED5B49, cn=KRANTI BHIMRAO PATIL
Date: 2022.08.10 19:37:35 +05'30'

(क्रांती पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी अग्रेषित :-

- मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

- सर्व अपर मुख्य सचिव, मंत्रालयीन विभाग
- सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग,
- मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
- मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
- उपमुख्यमंत्री यांचे सचिव
- प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
- सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
- प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
- प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
- प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरण, मुंबई
- सर्व मंत्रालयीन विभाग (मंत्रालयीन विभागाच्या खालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांना कळविण्याच्या विनंतीसह.)
- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
- आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई-४००००१.
- पोलीस आयुक्त मुंबई / पुणे / नागपूर / ठाणे / नाशिक / औरंगाबाद / सोलापूर / नवी मुंबई.
- सर्व विभागीय आयुक्त
- सर्व जिल्हाधिकारी
- महानगरपालिका आयुक्त पुणे, नागपूर, सोलापूर, कोल्हापूर, ठाणे, कल्याण अमरावती, औरंगाबाद, पिंपरी चिंचवड, नाशिक, नवी मुंबई, सांगली-मिरज-कुपवाड, अकोला.
- सर्व पोलीस उप महानिरिक्षक.
- सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
- सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक.
- महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
- संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, जुने सचिवालय, मुंबई.
- अध्यक्ष / उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव
- सभापती / उप सभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांचे खाजगी सचिव
- विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधानसभा यांचे खाजगी सचिव
- मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
- मुख्यमंत्री यांचे जनसंपर्क अधिकारी, मुंबई
- सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
- कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग-१, मुंबई,
- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग-२, मुंबई
- संचालक, उपवने व उद्याने, बांधकाम भवन, मुंबई.
- निवडनस्ती (कार्यासन-३०)

************************